महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,

२ मजला,शासकीय तंत्र निकेतन इमारत, ४९ खेरवाडी ,वांद्रे (पूर्व),मुंबई-४०००५१

ई-मेल द्वारे रवाना म रा व्यशिपमं/का-1/मान्यता/२०१९ /1072 दि 16/10/2019

प्रती,

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी (सर्व)

विषय- महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ ,शैक्षणिक वर्ष २०१९-२० मान्यता प्रक्रियाबाबत-

संदर्भ-मंडळाचे पत्र क्रमांक- म रा व्यशिपमं/का-1/मान्यता/२०१९ / १०४६, दिनांक-५/१०/१९

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना कळविण्यात येते की,सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाच्या नूतनीकरण मान्यता प्रक्रियेस मुदतवाढ देण्यात येत असून त्या बाबतचा कार्यक्रम(सुधारित) पुढील प्रमाणे राहील.

१) नूतनीकरण मान्यता करिता अर्ज केलेल्या संस्थांना नूतनीकरण शुल्क online भरण्यासाठी दिनांक-१८/१०/२०१९ पर्यंत संधी देण्यात येत आहे.

२)दिनांक-३०/१०/१९ पर्यंत निरीक्षण पूर्ण झालेल्या संस्थांचे अहवाल अपलोड करण्याची अंतिम तारीख १८/१०/२०१९ आहे.

३)ज्या संस्थांचे ३ वर्षातून एकदा निरीक्षण झालेले आहे,तसेच नवीन अभ्यासक्रम/तुकडी वाढ सुरु करून ३ वर्ष पूर्ण झालेली नाहीत अशा संस्थांचे निरीक्षण न करता त्यांचे online अर्ज तपासून योग्य तो अहवाल दिनांक -१८/१०/२०१९ पर्यंत अपलोड करावयाचा आहे.

४)एक व दोन वर्ष मुदतीचे अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांना दिनांक-२२.१०.२०१९ पर्यंत विद्यार्थी प्रवेशाकरिता मुदतवाढ देण्यात येत आहे. सहामाही अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेशाकरिता दिनांक ११.१०.२०१९ हा अंतिम दिनांक राहील.त्यास मुदतवाढ नाही.

तरी सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालयांनी त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित संस्थांना वरील प्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करण्याबाबत कळवावे व त्याचा अहवाल विहीत केलेल्या तारखेपर्यंत मंडळास सादर करावा.

करिता सचिव,

महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,

प्रत,

१) संचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय ,महाराष्ट्र राज्य,(का-८),यांना माहितीसाठी.
२) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रा.कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर.
३) संगणक विभाग